MHRG080010852019 नि.दि.दावा क्र.७१/२०१९

वसिमा इस्माईल जालगांवकर व इतर
वि.
हरबंसलाल ग्यानचंद कुकरेजा व इतर

## नियमीत दिवाणी दावा क्र. ७१/२०१९ मधील निशाणी क्र.५८ आणि ६० खालील एकत्रित आदेश

वादींतर्फे प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यासाठी झालेला उशीर माफ करण्याची विनंती करण्यात आली आहे व अबेटमेंटचा (Abatement) आदेश रद्द करुन मागितलेला आहे.

०२. वादी अर्जात असे कथन करतात की, प्रतिवादी क्र.१ हा दि.१९/०९/२०२१ रोजी मयत झालेला आहे. परंतु तो मयत झाल्याची माहिती वादींना नव्हती. त्यामुळे त्यांना विहित मुदतीत अर्ज दाखल करता आलेला नाही. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ मयत झाल्याची माहिती त्यांना दि.२१/०२/२०२३ रोजी पाठवलेली नोटीस प्रतिवादी क्र.१ मयत असल्याने तसा शेरा मारुन परत आली त्यावेळी समजली. सबब, वादींनी जो विलंब झालेला आहे, तो जाणीवपुर्वक झालेला नाही असे कथन केलेले आहे. त्यांनी झालेला विलंब माफ करुन आणि अबेटमेंटचा आदेश रद्द करुन मागितलेला आहे.

०३. त्याउलट प्रतिवादी क्र.१ तर्फे कायदेशीर प्रतिनिधी यांनी निशाणी क्र.६९ आणि ७० अन्वये दोन्हीही अर्जास म्हणणे देवून हरकत नोंदवलेली आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, वादींना जवळजवळ ४८५ दिवसांचा विलंब झालेला आहे. झालेल्या विलंबाबाबत वादींनी कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ तर्फे कायदेशीर प्रतिनिधी याने अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. उभयपक्षकारांतर्फे विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे

अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.१ हा दि.१९/०९/२०२१ रोजी मयत झालेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश २२, नियम १०-अ प्रमाणे मयत प्रतिवादीच्या विधिज्ञांनी प्रतिवादी मयत झाल्याची माहिती न्यायालयाला देणे बंधनकारक आहे. परंतु या दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ च्या विधिज्ञांनी तशी कोणतीही माहिती न्यायालयाला दिलेली दिसत नाही. वादींच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.१ मयत झाल्याची माहिती त्यांना दि.२७/०२/२०२३ रोजी प्रतिवादीला पाठवलेली नोटीस तो मयत आहे या कारणामुळे परत आली त्यावेळी झाली.

०५. मुदतीचे अधिनियम १९६३ चे आर्टिकल १२० प्रमाणे वादीने, उभयपक्षकारांपैकी जो पक्षकार मयत आहे त्याच्या मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांमध्ये कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. तसेच मुदतीत मयत पक्षकारांचे वारस अभिलेखावर न घेतल्यास तो दावा मयत पक्षकाराविरुद्ध अबेट (Abate) होतो. आदेश २२, नियम ४(५) प्रमाणे वादी विलंबाबाबत संयुक्तीक कारण दाखवत असेल तर न्यायालयाला विलंब माफ करुन कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याची परवानगी देता येईल. त्याप्रमाणे प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.१ मयत झाल्याची माहिती त्याच्या विधिज्ञांनी न्यायालयाला दिलेली दिसत नाही. त्याची माहिती वादींना दि.२७/०२/२०२३ रोजी झाल्याचे अर्जावरुनच स्पष्ट होते. प्रस्तुतचा अर्ज दि.१३/०६/२०२३ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. त्यावरुन असे दिसते की, वादींना, प्रतिवादी क्र.१ मयत झाल्याची माहिती झाल्यानंतर देखील जवळजवळ ४ महिन्यांच्या विलंबाने अर्ज दिलेला आहे. ज्यावेळी त्यांना प्रतिवादी क्र.१ मयत झाल्याची माहिती मिळाली म्हणजेच दि.२७/०२/२०२३ रोजीनंतर ते त्वरीत अर्ज देवू शकत होते, परंतु त्यांनी त्वरीत अर्ज का दिला नाही याचे कारण त्यांनी अर्जामध्ये दिलेले नाही. त्यामुळे अर्जातील कारण हे संयुक्तीक कारण असल्याचे दिसत नाही. परंतु दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय करण्याकरीता प्रतिवादी क्र.१ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करणे व अबेटमेंटचा (Abatement) आदेश रद्द करणे आवश्यक आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत वादींवर अर्जाचा खर्च ठेवणे योग्य होईल. सबब, मी पुढील आदेश पारीत करत आहे :-

MHRG080010852019 **नि.दि.दावा क्र.७१/२०१९**

## -: आदेश :-

| | |
|---|---|
| **०१.** | अर्ज (निशाणी क्र.५८ आणि ६०) रक्कम रु.१,०००/- च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहेत. खर्चाची रक्कम विधी सेवा प्राधिकरणाकडे जमा करण्यात यावी. |
| **०२.** | प्रतिवादी क्र.१ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन अबेटमेंटचा (Abatement) आदेश रद्द करण्यात येत आहे. |

**(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला )**

सही

खालापूर **(पी.एम.माने )**

दिनांकः ०४/०३/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,खालापूर